Agrowon, 26/09/2025

# मुंबई बाजार समितीची निवडणूक घेण्याचे आदेश

अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : मुंबई (वाशी) कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाची निवडणूक घेण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले. संचालक मंडळाची मुदत संपल्यानंतर प्रशासकाची निवड करण्यात आली होती, ती रद्द करण्यात आली आहे. यामुळे आता निवडणूक होणार की, राष्ट्रीय बाजाराची अधिसूचना निघणार याकडे बाजार घटकांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान राष्ट्रीय बाजाराची अधिसूचना १५ दिवसांच्या आत निघणार असल्याचे सूतोवाच पणनमंत्री जयकुमार रावल यांनी नुकतेच पुण्यात केले होते. बाजार समितीचे उपसभापती हुकूमचंद आमधारे, संचालक धनंजय वाडकर, अशोक वाळुंज यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने हा आदेश दिला. सुनावणीदरम्यान बाजार समितीचा कोणताही प्रतिनिधी हजर नव्हता. त्यामुळे हा निकाल विरोधात गेल्याचे बोलले जात आहे. न्यायालयाच्या या आदेशानुसार जोपर्यंत निवडणुका होत नाहीत तोपर्यंत बाजार समिती कोणतेही धोरणात्मक निर्णय घेऊ शकणार नाही. ३१ ऑगस्ट रोजी संचालक मंडळाची मुदत संपल्यानंतर पणन संचालक विकास रसाळ यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती; मात्र ती रद्द केली आहे.

Lokmat, 23/09/2025

# माल विक्रीसाठी 'पणन'ची कालसुसंगत पुनर्रचना हवी

## गोयल समिती अहवालावर पणनमंत्र्यांनी दिली माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क



पुणे : देशांतर्गत तसेच जगाच्या अनेक बाजारपेठांमध्ये स्पर्धात्मक दरात विकता येतील अशी निर्यातक्षम आणि दर्जेदार फळे, भाजीपाला व इतर कृषी उत्पादने राज्यात घेतली जातात. त्या उत्पादनाला विकण्यासाठी सक्षम पणन व्यवस्थेच्या माध्यमातून मूल्यवर्धन साखळी तयार करणे, तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून ग्रामीण व अर्थव्यवस्था सक्षम करणे हा सरकारचा उद्देश आहे. यासाठी पणन विभागाची कालसुसंगत पुनर्रचना आवश्यक असून गोयल समितीचा अहवाल राज्य सरकारला मार्गदर्शक ठरेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्यासमोर लवकरच या अहवालाचे सादरीकरण करून अहवाल अंतिम केला जाईल, अशी माहिती पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

राज्यातील पणन विभागाची कालसुसंगत पुनर्रचना व सक्षमीकरण करण्यासाठी निवृत्त सनदी अधिकारी सुधीर कुमार गोयल यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीने अभ्यास करून आपला अहवाल राज्य सरकारला सादर केला आहे. त्यावर चर्चा करण्यासाठी तळेगाव दाभाडे येथील राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था येथे त्याचे सादरीकरण पणनमंत्री जयकुमार रावल यांच्यासमोर करण्यात आले. यावेळी सुधीर कुमार गोयल, माजी अतिरिक्त सचिव उमाकांत दांगट, माजी पणन संचालक सुनील पवार, विजय लहाने, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम उपस्थित होते.

या अहवालामध्ये पणन विभागाची कालसुसंगत पुनर्रचना, सबलीकरण आणि सक्षमीकरण यावर सविस्तर शिफारसी करण्यात आल्या आहेत. यामध्ये मंत्रालयीन व क्षेत्रीय स्तरावर स्वतंत्र संवर्ग निर्माण करणे, पणन महासंघ, वखार महामंडळ, कापूस पणन महासंघ, ग्राहक महासंघ यांची पुनर्रचना, मूल्यसाखळी आधारित पणन व्यवस्था अशा विविध अंगाने अभ्यास करण्यात आला आहे. शेतमाल निर्यातक्षम बनवून त्याचे उत्पन्न कसे वाढवता येईल या अनुषंगाने पणन विभागाचे प्रयत्न सुरू आहेत, असे गोयल म्हणाले.

रावल म्हणाले, "शेतकरी केंद्रबिंदू मानून पणन विभाग पुढे जात आहे. राज्याची अर्थव्यवस्था तीन ट्रिलियन डॉलर करण्यासाठी ग्रामीण बळकट होणे आवश्यक आहे, असे रावल म्हणाले.

सकाळ अॅग्रोवन

# 'एनआयपीएचटी'मध्ये त्रिभुवन विद्यापीठाचे उपकेंद्र

## पणनमंत्री रावल : फूल उत्पादकांसाठी आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण वर्ग

अॅग्रोवन वृत्तसेवा



जयकुमार रावल

पुणे : राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेच्या (एनआयपीएचटी) आवारात त्रिभुवन राष्ट्रीय सहकार विद्यापीठाचे उपकेंद्र होणार आहे. याद्वारे नेदरलँड, इस्राईल, जपान व टांझानिया येथील विद्यापीठांचे सहकार्य घेत फूल उत्पादक शेतकऱ्यांकरिता आंतरराष्ट्रीय पातळीववरील प्रशिक्षण वर्ग सुरू करावेत, अशा सूचना पणनमंत्री तथा राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी दिल्या.

या वेळी राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेचे सचिव तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सर व्यवस्थापक विनायक कोकरे, राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेचे संचालक मिलिंद आकरे, व्यवस्थापक, सहायक व्यवस्थापक आदी उपस्थित होते.

श्री. रावल म्हणाले, की राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे येथे त्रिभुवन सहकार विद्यापीठाचे उपकेंद्र लवकरच सुरू करण्यात येईल, यामुळे संस्थेच्या उत्पन्नवाढीस मोठी चालना मिळेल. नेदरलँड, इस्राईल, जपान व टांझानिया येथील विद्यापीठांचे सहकार्य घेत फूल उत्पादक शेतकऱ्यांकरिता आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रशिक्षण वर्ग सुरू करावेत.

आफ्रिका खंडाअंतर्गत येणाऱ्या देशामधील कृषी विभागाशी संपर्क साधून तेथील शेतकऱ्यांना या संस्थेमध्ये किंवा त्या देशामध्ये जाऊन प्रशिक्षण द्यावे. इतर राज्यांच्या कृषी, फलोत्पादन विभागांशी संपर्क साधून त्या राज्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांना संस्थेत प्रशिक्षण द्यावे. राज्यातील साखर कारखान्यांना संस्थेचे सभासद करून त्यांच्या कार्यक्षेत्रामधील शेतकऱ्यांसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम घेणे. शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण राबवावे. संस्थेच्या वतीने कृषी पर्यटन व नॅचरोपॅथीसारखे प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करावेत. बांबू मूल्यवर्धन केंद्राच्या बांबू सायकलचा प्रायोगिक तत्त्वावर वापर करण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

Agrowon, 22/09/2025

# शेतीमालाची मूल्यवर्धन साखळी तयार करा

## पणनमंत्री जयकुमार रावल यांनी घेतला 'मॅग्नेट' टप्पा २ च्या अंमलबजावणीचा आढावा

ॲग्रोवन वृत्तसेवा



जयकुमार रावल

पुणे : महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्पाच्या (मॅग्नेट) दुसऱ्या टप्प्यातील अंमलबजावणी जागतिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करून प्रभावीपणे करावी. देशांतर्गत तसेच जगाच्या बाजारपेठेत शेतीमालाला स्पर्धात्मक दर मिळण्यासाठी प्रकल्पाच्या माध्यमातून शेतीमालाची प्रभावी मूल्यवर्धन साखळी तयार करावी. नागरिकांच्या जीवनमानात परिवर्तन करणारा प्रकल्प असून बियाण्यांपासून ते उत्पादन आणि त्याच्या विक्रीपर्यंत कृती आराखडा तयार करावा, अशा सूचना मॅग्नेट प्रकल्पाचे अध्यक्ष आणि पणनमंत्री जयकुमार रावल यांनी केल्या.

मॅग्नेट प्रकल्प १ आढावा आणि टप्पा क्रमांक २ च्या नियोजन आढावा बैठकीत नुकतेच मंत्री रावल बोलत होते. या वेळी केंद्रीय कृषी मंत्रालयाचे विपणन व तपासणी संचालनालयाचे विपणन अधिकारी व्ही. एस. यादव, पणन संचालक विकास रसाळ, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, मॅग्नेटचे प्रकल्प संचालक आणि पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे, 'नाबार्ड'चे उपमहाप्रबंधक हेमंत कुंभारे आदी उपस्थित होते.

श्री. रावल म्हणाले, की राज्यातील डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरू, चिकू, स्ट्रॉबेरी, भेंडी, मिरची, आंबा, काजू, लिंबू व पडवळ आणि द्राक्ष, पपई, हळद, पान २ वर »

### आधुनिक तंत्रज्ञानाची निवड, वापर करावा

ते म्हणाले, की राज्यात उच्च तंत्रज्ञानयुक्त रोपवाटिकांची निर्मिती करून त्यामध्ये फळपिकांची दर्जेदार रोपे तयार करावीत. याद्वारे उच्च दर्जाच्या आणि निर्यातक्षम कृषी उत्पादनांची वाढ होण्यास मदत होईल. मॅग्नेट प्रकल्पामध्ये सौरऊर्जा आधारित शीतगृह, सोलर कंडक्शन ड्रायर, ट्रककरिता रिचार्जेबल रिफर कंटेनर, बायोमास आधारित शीतगृह माती परीक्षण यंत्र, माहिती तंत्रज्ञानावर आधारित डिजिटल शेती सल्ला, ड्रोनद्वारे रसायनांची फवारणी, मिनी ऑप्टिकल ग्रेडर, उपग्रहआधारित शेती सल्ला, सीताफळ पल्प यंत्र, बाष्पोत्सर्जन आधारित कूल चेंबर, सौर कीटक सापळा अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानाची निवड करून वापर करावा. बैठकीत श्री. कोकरे यांनी आशियाई विकास बँक अर्थसाहाय्यित 'मॅग्नेट' प्रकल्प १ आढावा आणि टप्पा २ च्या नियोजनाबाबत सविस्तर माहिती दिली.

---

Agrowon, 22/09/2025

# शेतीमालाची मूल्यवर्धन साखळी तयार करा

» पान १ वरून

आले, अंजीर, शेवगा, टोमॅटो या फलोत्पादन पिकांच्या व फुलांच्या मूल्यसाखळ्यांमध्ये खासगी गुंतवणुकीला आकर्षित करून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करावी. फळे व भाजीपाल्याचे काढणीपश्चात नुकसान कमी करणे व स्पर्धात्मक दर मिळविण्यासाठी शितगृहाची साठवणूक क्षमता वाढविण्यावर भर द्यावा. उत्पादन काढणीनंतर साठवणुकीसाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा.

ते म्हणाले, की शेतकरी उत्पादक संस्थांची मूल्य साखळी गुंतवणूकदार व सहभागी घटकांची संस्थात्मक क्षमता वाढ करण्यास प्राधान्य देण्यात यावे. शाश्वतता आणि हवामान अनुकूल व प्रगत तंत्रज्ञानाचा वापर, बाजारपेठ व निर्यातभिमुख शेती व्यवसायाचा विकास करावा. जागतिक मागणीनुसार निर्यात सुविधा केंद्रे विकसित करावीत. विभागीयस्तरावर प्रयोगशाळा निर्माण केल्या पाहिजेत.

शेतकऱ्यांच्या उत्पादित शेतीमालाचे मूल्यवर्धन करून जलद पुरवठा साखळीच्या माध्यमातून देशाबरोबरच जागतिक बाजारपेठेत शेतीमाल स्पर्धात्मक दरात विकला जाईल याकरिता सुविधा विकसित करण्याचे नियोजन करावे. शेतीमालाची नासाडी टाळून तो अधिक काळ टिकला पाहिजे, यादृष्टीने कार्यवाही करावी. काढणी पश्चात, वर्गीकरण, प्रतवारी (ग्रेडिंग), पॅकेजिंग, मालाचे मूल्यवर्धन, साठवणूक ही साखळी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक सक्षम करावी, असे त्यांनी सांगितले.

Agrowon, 21/09/2025

# पणन विभागाची पुनर्रचना काळाची गरज : पणनमंत्री रावल

## गोयल समितीचे सादरीकरण, अंतिम निर्णय मुख्यमंत्र्यांकडे

ॲग्रोवन वृत्तसेवा



जयकुमार रावल

पुणे : ''निर्यातक्षम आणि दर्जेदार फळे, भाजीपाला व इतर कृषी उत्पादने राज्यात घेतली जातात. त्या उत्पादनाला विकण्यासाठी सक्षम पणन व्यवस्थेच्या माध्यमातून मूल्यवर्धन साखळी तयार करणे, तसेच अर्थव्यवस्था सक्षम करणे हा सरकारचा उद्देश आहे. यासाठी पणन विभागाची कालसुसंगत पुनर्रचना आवश्यक असून गोयल समितीचा अहवाल राज्य शासनाला मार्गदर्शक ठरेल. लवकरच या अहवालाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर सादरीकरण करून अहवाल अंतिम केला जाईल'', असे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले.

राज्याच्या पणन विभागाची कालसुसंगत पुनर्रचना व सक्षमीकरण करण्यासाठी निवृत्त सनदी अधिकारी सुधीरकुमार गोयल यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीने अभ्यास करून आपला अहवाल शासनास सादर केला आहे. त्या अहवालावर चर्चा करण्यासाठी त्याचे सादरीकरण श्री. रावल यांना शुक्रवारी (ता.१९) तळेगाव येथील राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेत केले.

या वेळी समितीचे अध्यक्ष गोयल, माजी कृषी आयुक्त उमाकांत दांगट, माजी पणन संचालक सुनील पवार, विजय लहाने, महाराष्ट्र कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम उपस्थित होते.

या अहवालामध्ये एकूण १५ प्रकरणे असून पणन विभागाची कालसुसंगत पुनर्रचना, सबलीकरण आणि सक्षमीकरण यावर सविस्तर शिफारशी करण्यात आल्या आहेत. यामध्ये मंत्रालयीन व क्षेत्रीय स्तरावर स्वतंत्र संवर्ग निर्माण करणे, पणन महासंघ, वखार महामंडळ, कापूस पणन महासंघ, ग्राहक महासंघ यांची पुनर्रचना, मूल्यसाखळी आधारित पणन व्यवस्था अशा विविध अंगाने अभ्यास करण्यात आला आहे. शेतकऱ्याचा शेतीमाल निर्यातक्षम बनवून त्याचे उत्पन्न कसे वाढवता येईल, या अनुषंगाने पणन विभागाचे प्रयत्न चालू आहेत, असे समितीचे अध्यक्ष गोयल म्हणाले.

### 'शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक दर मिळेल'

''शेतकरी केंद्रबिंदू मानून पणन विभाग पुढे जात आहे. राज्याची अर्थव्यवस्था तीन ट्रिलियन डॉलर करण्यासाठी ग्रामीण बळकट होणे आवश्यक आहे. पणन व्यवस्था बळकट झाल्यास शेतकऱ्याच्या उत्पन्नात निश्चित वाढ होईल. यासाठी गोयल समितीचा अहवाल मार्गदर्शक ठरेल. पुढील पंधरा दिवसांत अहवालाचे बारकाईने परीक्षण करून आवश्यक शिफारशी केल्या जातील. या अहवालाच्या अंमलबजावणीमुळे कृषी मूल्यसाखळी अधिक सक्षम होऊन शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक दर मिळेल,'' असा विश्वास श्री. रावल यांनी व्यक्त केला.

मुंबई तरुण भारत
Pune Edition | 2025-09-19 | Page- 3
epaper.mahamtb.con

# तंत्रज्ञान संस्थेत जागतिक पातळीवरील प्रशिक्षण द्या

## पणनमंत्री जयकुमार रावल यांचे निर्देश

**पुणे, दि. १८ : प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था प्रशिक्षण देण्याचे काम करत आहे. याबरोबर परदेशी विद्यापीठांशी सामंजस्य करार करून देशातील तसेच परदेशातील प्रशिक्षणार्थींना जागतिक पातळीवरील प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी. तसेच सर्व सोयी उपलब्ध कराव्यात, असे निर्देश राज्याचे पणनमंत्री तथा राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी दिले.

राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था तळेगाव दाभाडे या संस्थेच्या नियामक मंडळाच्या सभेत ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेचे संचालक मिलिंद आकरे, महाराष्ट्र राज्य कृषी पणन



मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे, राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेचे व्यवस्थापक रविंद्र देशमुख व विश्वास जाधव आदी उपस्थित होते.

रावल म्हणाले की, ''प्रशिक्षणाच्या अनुषंगाने प्रथम क्रमांक नेदरलॅण्ड्स, इस्रायल, जपान व तांझानिया या देशातील विद्यापीठांशी सहकार्य करून राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेत प्रशिक्षण वर्ग सुरू करावे.

संस्थेत नावीन्यपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रम व उपक्रम राबवण्यासाठी सल्लागार समिती गठित करावी. या समितीत कृषी विभागातील, कृषी विद्यापीठातील तज्ज्ञ अधिकारी, भारतीय कृषी संशोधन परिषद–काढणी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान केंद्रीय संस्था, लुधियाना, राष्ट्रीय कृषी विपणन संस्था, जयपूर येथील तज्ज्ञ अधिकारी, बी–बियाणे कंपनींचे प्रतिनिधी, खत उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी, अन्नप्रक्रिया उद्योगामध्ये काम करणाऱ्या नामवंत कंपन्यांचे प्रतिनिधी तसेच खासगी क्षेत्रातील प्रशिक्षण क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या तज्ज्ञांचा समावेश करावा.

संस्थेची सभासद संख्या वाढविण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्याबाबत यावी. त्यानुसार राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्या, सहकारी फेडरेशन, साखर कारखाने, विविध कार्यकारी सोसायट्या, कापूस फेडरेशन व मार्केटिंग फेडरेशन आदी संस्थांना सभासद करावे,'' असेही रावल म्हणाले.

Powered by Bharati Web

Sakal, 19/09/2025

# कोकणात संपूर्ण स्वयंचलित काजू प्रक्रिया प्रकल्प उभारा

## पणनमंत्री जयकुमार रावल यांची सूचना

**मार्केट यार्ड, ता. १८ :** 'कोकणामध्ये व्हिएतनामच्या धर्तीवर संपूर्ण स्वयंचलित काजू प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी नियोजन करण्यात यावे,' अशी सूचना राज्याचे पणनमंत्री आणि महाराष्ट्र राज्य काजू परिषदेचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी दिली. ते पुण्यात झालेल्या महाराष्ट्र राज्य काजू परिषदेच्या संचालक मंडळाच्या सभेत बोलत होते.

या वेळी काजू परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय कदम, मार्केटिंग फेडरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्रीधर दुबेपाटील, शासन नियुक्त संचालक रूपेश बेलोसे, डॉ. परशराम पाटील आणि धनंजय यादव उपस्थित होते.

रावल म्हणाले की, कोकणामध्ये अपुऱ्या साठवणूक सुविधेमुळे ५००, १,००० आणि ५,००० मेट्रिक टन क्षमतेची गोदामे उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. काजू फळप्रक्रिया विकास योजना २०२३ अंतर्गत काजू बोंड रसावरील सामाईक प्रक्रिया केंद्र, जिल्हा स्तरावर आधुनिक मध्यवर्ती सुविधा केंद्र, तसेच ओले काजूगर काढणे व प्रक्रियेसाठी उभारण्यात येणाऱ्या केंद्रांना अर्थसाह्य देण्याच्या योजना शासनास सादर कराव्यात, असेही त्यांनी सांगितले. सभेत कोकणात प्रकल्प उभारणी, 'अपेडा'च्या धर्तीवर प्रकल्पांचे आधुनिकीकरण, कोल्हापूर, सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांचे अर्थसक्षम अहवाल तयार करणे आणि गोदाम योजनांबाबत सविस्तर चर्चा झाली.

पुढारी

# ‘एनआयपीएचटी’त त्रिभुवन सहकारी विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू करा

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

देशातील पहिल्या त्रिभुवन सहकारी विद्यापीठाचे उपकेंद्र हे तळेगाव दाभाडे (ता. मावळ, जि. पुणे) येथील राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेत (एनआयपीएचटी) सुरू करण्याबाबत राज्याचे पणनमंत्री व एनआयपीएचटीचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी मान्यता दिली आहे. याशिवाय परदेशी विद्यापीठांशी सामंजस्य करार करावेत. परदेशातील व देशातील प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करण्यासाठी आणि त्या विद्यापीठांशी चर्चा करून लवकरच असे प्रशिक्षण सुरू करण्याबाबतच्या सूचनाही त्यांनी केल्या आहेत.

एनआयपीचटीच्या संचालक मंडळाची बैठक बुधवारी (दि.१७) मार्केट यार्डातील महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या सभागृहात त्यांच्या अध्यक्षतेखाली झाली, त्या वेळी त्यांनी या सूचना दिल्या आहेत. या वेळी एनआयपीएचटीचे संचालक मिलिंद आकरे यांच्यासह पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, एनआयपीएचटीचे व्यवस्थापक रवींद्र देशमुख, विश्वास जाधव, लेखा अधिकारी अजय नागवडे, कनिष्ठ अभियंता गिरीश गाजेंगी आदी उपस्थित होते.



**एनआयपीएचटीच्या बैठकीत बोलताना पणनमंत्री जयकुमार रावल. या वेळी उजवीकडे एनआयपीएचटीचे संचालक मिलिंद आकरे व उपस्थित मान्यवर.**

### पणनमंत्री रावल म्हणाले...

- एनआयपीएचटी संस्थेचे सभासद वाढीसाठी मोहीम सुरू करा, ड्रोन प्रशिक्षणही द्या.
- एनआयपीएचटी संस्थेचे बाजार समित्या, सहकारी महासंघ, साखर कारखाने, विकास सोसायट्या, कापूस महासंघ, पणन महासंघास सभासद करावे.
- शेतमाल काढणीपश्चात तंत्रज्ञान माहितीसाठी एक्झिबिशन सेंटर सुरू करण्यास प्राधान्य द्यावे.

एनआयपीएचटीमध्ये नावीन्यपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यासाठी लवकरात लवकर सल्लागार समिती गठित करण्याच्या सूचना करून रावल म्हणाले, या सल्लागार समितीत कृषी विभागातील, कृषी विद्यापीठातील तज्ज्ञ अधिकारी, सिपेट, लुधीयाना तज्ज्ञ अधिकारी, एनआयएएम-जयपूरमधील तज्ज्ञ अधिकारी, बी-बियाणे कंपनीचे प्रतिनिधी, तसेच खासगी क्षेत्रातील प्रशिक्षण क्षेत्रामध्ये काम करणा-या तज्ज्ञांचा समावेश करावा.

## शेतमाल मूल्यवर्धनासाठी मॅग्नेट प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करा

**▪ पणनमंत्र्यांच्या सूचना**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्पाच्या (मॅग्नेट) दुसऱ्या टप्प्यातील अंमलबजावणी करताना जागतिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करून प्रकल्पाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचना पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिल्या. शेतमाल काढणीपश्चात वर्गीकरण, प्रतवारी (ग्रेडिंग), पॅकेजिंग, मालाचे मूल्यवर्धन, साठवणूक ही साखळी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक सक्षम करावी. जेणेकरून शेतमालाची नासाडी टाळून तो अधिक काळ टिकला पाहिजे, यादृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

देशांतर्गत तसेच जगाच्या बाजारपेठेत शेतमालाला स्पर्धात्मक दर मिळण्यासाठी प्रकल्पाच्या माध्यमातून शेतमालाचे प्रभावी मूल्यवर्धन साखळी तयार करा. नागरिकांच्या जीवनमानात परिवर्तन करणारा प्रकल्प असून, बियाण्यांपासून ते उत्पादन आणि त्याच्या विक्रीपर्यंत कृती आराखडा तयार करावेत, असेही त्यांनी सांगितले.

आशियाई विकास बँक अर्थ सहाय्यीत महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्प १ आढावा आणि टप्पा क्रमांक २ च्या नियोजनाची आढावा बैठक महाराष्ट्र कृषी पणन मंडळाच्या मार्केट यार्डातील कार्यालयात झाली. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी मॅग्नेटचे प्रकल्प संचालक आणि पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी मॅग्नेट प्रकल्पाचा टप्पा क्रमांक एकचा आढावा आणि टप्पा क्रमांक २ च्या नियोजनाबाबत सविस्तर माहिती दिली. बैठकीस अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव, कृषी पणन संचालक विकास रसाळ, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, नाबार्डचे उप सरव्यवस्थापक हेमंत कुंभारे आदी उपस्थित होते.

### मूल्यसाखळ्यांद्वारे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवा

राज्यातील डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरू, चिकू, स्ट्रॉबेरी, भेंडी, मिरची, आंबा, काजू, लिंबू व पडवळ आणि द्राक्ष, पपई, हळद, आले, अंजीर, शेवगा, टोमॅटो या फलोत्पादन पिकांच्या व फुलांच्या मूल्यसाखळ्यांमध्ये खासगी गुंतवणूक आकर्षित करून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करावी. फळे व भाजीपाल्याचे काढणीपश्चात नुकसान कमी करणे व स्पर्धात्मक दर मिळवण्यासाठी शीतगृहाची साठवणूक क्षमता वाढविण्यावर भर द्यावा. उत्पादन काढणीनंतर साठवणुकीसाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा.

## ‘कोकणात संपूर्ण स्वयंचलित काजू प्रक्रिया प्रकल्प उभारा’

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील तसेच कोकणातील काजू उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक लाभ मिळावा, यासाठी कोकणामध्ये काजू परिषदेच्या माध्यमातून व्हिएतनामच्या धर्तीवर संपूर्ण स्वयंचलित काजू प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी नियोजन करण्याच्या सूचना राज्याचे पणनमंत्री तथा महाराष्ट्र राज्य काजू परिषदेचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी दिल्या.



येथील पणन मंडळाच्या मार्केट यार्डातील मुख्यालयात महाराष्ट्र राज्य काजू परिषदेच्या संचालक मंडळाची बैठक बुधवारी (दि. १७) आयोजित केली होती. या वेळी महाराष्ट्र राज्य काजू परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय कदम, मार्केटिंग फेडरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्रीधर दुबे पाटील, अपेडाचे उपसरव्यवस्थापक प्रशांत वाघमारे तसेच शासन नियुक्त संचालक रुपेश बेलोसे, डॉ. परशराम पाटील व धनंजय यादव यांच्यासह पणनचे उपसरव्यवस्थापक सुभाष घुले, मिलिंद जोशी व अन्य अधिकारी उपस्थित होते.

रावल म्हणाले की, कोकणामध्ये अपुऱ्या साठवणूक सुविधेमुळे पाचशे, एक हजार आणि पाच हजार मेट्रिक टन क्षमतेची गोदामे उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. यामधून एकूण १.२५ लाख मेट्रिक टन क्षमतेची गोदामे उभारली जाणार असून शासनाच्या मान्यतेने ५० टक्के अनुदान देण्याबाबत निर्णय घेतला जाईल.

Pune Edition
Sep 19, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# मूल्यवाढीसाठी मॅग्नेटची कास धरा

## रावल यांचे आराखडा तयार करण्याचे आदेश

**पुणे** : देशांतर्गत तसेच जगाच्या बाजारपेठेत शेतमालाला स्पर्धात्मक दर मिळण्यासाठी प्रकल्पाच्या माध्यमातून शेतमालाची प्रभावी मूल्यवर्धन साखळी तयार करा. महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्प (मॅग्नेट)च्या दुसऱ्या टप्प्यातील अंमलबजावणी करताना जागतिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करून प्रकल्पाची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. नागरिकांच्या जीवनमानात परिवर्तन करणारा प्रकल्प असून, बियाणापासून ते उत्पादन आणि त्याच्या विक्रीपर्यंत कृती आराखडा तयार करावा, असे आदेश राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिले.

आशियाई विकास बँक अर्थसहाय्यत महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्प १ आढावा आणि टप्पा क्र. २च्या नियोजन आढावा बैठकीत रावल बोलत होते. पणनमंत्री म्हणाले, राज्यातील डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरू, चिकू, स्ट्रॉबेरी, भेंडी, मिरची, आंबा, काजू, लिंबू व पडवळ आणि द्राक्ष, पपई, हळद, आले, अंजीर, शेवगा, टोमॅटो या फलोत्पादन पिकांच्या व फुलांच्या मूल्यसाखळ्यांमध्ये खासगी गुंतवणूक आकर्षित करून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करावी. फळे व भाजीपाल्याचे काढणीपश्चात नुकसान कमी करणे व स्पर्धात्मक दर मिळवण्यासाठी शीतगृहाची साठवणूक क्षमता वाढवण्यावर भर द्यावा. उत्पादन काढणीनंतर साठवणुकीसाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा. शेतकरी उत्पादक संस्थांनी मूल्य साखळी गुंतवणूकदार व सहभागी घटकांची संस्थात्मक क्षमता वाढ करण्यास प्राधान्य देण्यात यावे. शाश्वतता आणि हवामान अनुकूल व प्रगत तंत्रज्ञानाचा वापर, बाजारपेठ व निर्यातभिमुख शेती व्यवसायाचा विकास करावा. शेतकऱ्यांच्या उत्पादित शेतमालाचे मूल्यवर्धन करून जलद पुरवठा साखळीच्या माध्यमातून देशासोबतच जागतिक बाजारपेठेत शेतमाल स्पर्धात्मक दरात विकला जाईल याकरता सुविधा विकसित करण्याचे नियोजन करावे. शेतमालाची नासाडी टाळून तो अधिक काळ टिकला पाहिजे, या दृष्टीने कार्यवाही करावी. काढणीपश्चात, वर्गीकरण, प्रतवारी (ग्रेडिंग), पॅकेजिंग, मालाचे मूल्यवर्धन, साठवणूक ही साखळी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक सक्षम करावी.



> **राज्यात उच्च तंत्रज्ञानयुक्त रोपवाटिकांची निर्मिती करून त्यामध्ये फळपिकांची दर्जेदार रोपे तयार करावी. याद्वारे उच्च दर्जाच्या आणि निर्यातक्षम कृषी उत्पादनाची वाढ होण्यास मदत होईल. मॅग्नेट प्रकल्पामध्ये सौरऊर्जा आधारित शीतगृह, सोलर कंडक्शन ड्रायर, ट्रककरता रिचार्जेबल रिफर कंटेनर, बायोमास आधारित शीतगृह माती परीक्षण यंत्र, माहिती तंत्रज्ञानावर आधारित डिजिटल शेती सल्ला, ड्रोनद्वारे रसायनांची फवारणी, मिनी ऑप्टिकल ग्रेडर, उपग्रहआधारित शेती सल्ला, सीताफळ पल्प यंत्र, बाष्पोर्जन आधारित कूल चेंबर, सौर कीटक सापळा अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानाची निवड करून वापर करावा.**
>
> **– जयकुमार रावल, पणनमंत्री**

Pune Edition
Sep 19, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

Maharashtra Times, 19/09/2025

# 'कोकणात स्वयंचलित काजू प्रक्रिया प्रकल्प'

**पुणे :** 'काजू उत्पादक शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा व्हावा, यासाठी कोकणामध्ये काजू परिषदेच्या माध्यमातून व्हिएतनामप्रमाणे संपूर्ण स्वयंचलित काजू प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात येणार आहे,' अशी घोषणा पणनमंत्री आणि राज्य काजू परिषदेचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी केली.

राज्य काजू परिषदेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत ते बोलत होते. परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय कदम, मार्केटिंग फेडरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्रीधर दुबे पाटील, संचालक रूपेश बेलोसे, डॉ. परशुराम पाटील, धनंजय यादव या वेळी उपस्थित होते.

'कोकणामध्ये अपुऱ्या साठवणूक सुविधेमुळे ५००, १००० आणि ५००० मेट्रिक टन क्षमतेची गोदामे उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. यामधून एकूण सव्वा लाख मेट्रिक टन क्षमतेची गोदामे उभारली जाणार असून, पन्नास टक्के अनुदान देण्याबाबत निर्णय घेतला जाईल. काजू फळप्रक्रिया विकास योजनेंतर्गत काजू बोंड रसासाठी सामाईक प्रक्रिया केंद्र उभारणी, जिल्हा स्तरावर काजू प्रक्रियेसाठी मध्यवर्ती सुविधा केंद्र उभारणी; तसेच ओले काजूगर काढणे प्रक्रियेसाठी उभारण्यात येणाऱ्या प्रक्रिया केंद्रांना अर्थसाह्य देण्यात येईल,' असे रावल यांनी सांगितले.

'राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेने परदेशी विद्यापीठांशी करार करून जागतिक पातळीवरील प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी. संस्थेमध्ये त्रिभुवन सहकारी विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू करा,' अशी सूचना संस्थेचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी केली. तळेगाव दाभाडे येथील संस्थेच्या संकुलात नियामक मंडळाच्या बैठकीत ते बोलत होते. राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेचे संचालक मिलिंद आकरे, मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे, रवींद्र देशमुख, विश्वास जाधव आदी उपस्थित होते.

## 'जागतिक बाजारात स्पर्धात्मक दर मिळावा'

'महाराष्ट्र अॅग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्पाच्या (मॅग्नेट) माध्यमातून जागतिक बाजारपेठेत शेतमालाला स्पर्धात्मक दर मिळण्यासाठी शेतमालाची प्रभावी मूल्यवर्धन साखळी तयार करा. बियाणांपासून ते उत्पादन आणि त्याच्या विक्रीपर्यंत कृती आराखडा तयार करा,' अशी सूचना जयकुमार रावल यांनी केली. 'डाळिंब, केळी, संत्री, मोसंबी, सीताफळ, पेरू, चिकू, स्ट्रॉबेरी, भेंडी, मिरची, आंबा, काजू, लिंबू, पडवळ, द्राक्ष, पपई, हळद, आले, अंजीर, शेवगा, टोमॅटो या फलोत्पादन पिकांच्या व फुलांच्या मूल्यसाखळ्यांमध्ये खासगी गुंतवणुकदारांना आकर्षित करून शेतकऱ्यांचे उत्पन्नात वाढ करता येऊ शकते,' असे रावल यांनी सांगितले.

Agrowon, 19/09/2025

महाॲग्रो

# ‘एनआयपीएचटी’मध्ये जागतिक पातळीवरील प्रशिक्षण द्या

## पणनमंत्री जयकुमार रावल यांची नियामक मंडळ सभेत सूचना

ॲग्रोवन वृत्तसेवा



जयकुमार रावल

पुणे : गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्था (एनआयपीएचटी) प्रशिक्षण देण्याचे काम करत आहे. या बरोबर परदेशी विद्यापीठांशी सामंजस्य करार करून देशातील तसेच परदेशातील प्रशिक्षणार्थींना जागतिक पातळीवरील प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी. सोयी उपलब्ध करण्याचे निर्देश राज्याचे पणन मंत्री तथा राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान (एनआयपीएचटी) संस्थेचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी दिले.

राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्था तळेगाव दाभाडे या संस्थेच्या नियामक मंडळाच्या बुधवारी (ता.१७) आयोजित सभेत ते बोलत होते. या वेळी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेचे संचालक श्री मिलिंद आकरे, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे, राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेचे व्यवस्थापक रविंद्र देशमुख व विश्वास जाधव आदी उपस्थित होते.

श्री. रावल म्हणाले, की प्रशिक्षणाच्या अनुषंगाने प्रथमक्रमाने नेदरलँड, इस्रायल, जपान व टांझानिया या देशांतील विद्यापीठांशी सहकार्य करून राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेत प्रशिक्षण वर्ग सुरू करावेत. संस्थेत नावीन्यपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रम व उपक्रम राबविण्यासाठी सल्लागार समिती स्थापन करावी. या समितीत कृषी विभागातील, कृषी विद्यापीठातील तज्ञ अधिकारी, भारतीय कृषी संशोधन परिषद-काढणी अभियांत्रिकी-आणि तंत्रज्ञान केंदीय संस्था, लुधियाना, राष्ट्रीय कृषी विपणन संस्था, जयपूर येथील तज्ज्ञ अधिकारी, बी-बियाणे कंपनींचे प्रतिनिधी, खत उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी, अन्न प्रक्रिया उद्योगांमध्ये काम करणाऱ्या नामवंत कंपन्यांचे प्रतिनिधी तसेच खासगी क्षेत्रातील प्रशिक्षण क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या तज्ज्ञांचा समावेश करण्याचा सूचना श्री. रावल यांनी दिल्या.

संस्थेची सभासद संख्या वाढविण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्याबाबत यावी. त्यानुसार राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्या, सहकारी फेडरेशन, साखर कारखाने, विविध कार्यकारी सोसायट्या, कापूस फेडरेशन व मार्केटिंग फेडरेशन आदी संस्थांना सभासद करावे.

प्रत्येक बाजार समितींच्या वार्षिक अर्थसंकल्पामध्ये प्रशिक्षणासाठी तरतूद करावी तसेच बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्याना माहिती करून देण्यात यावी. राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था तळेगाव दाभाडे येथे त्रिभुवन सहकारी विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू करा.जागतिक पातळीवरील सुगीपश्चात तंत्रज्ञान राज्यातील व देशातील शेतकऱ्यांना उपलब्ध करण्यासाठी एक्झिबिशन सेंटर सुरू करावे. बदलत्या काळानुसार संस्थेमध्ये ड्रोन चालक प्रशिक्षण सुरू करावे, अशा सूचना श्री. रावल यांनी या वेळी दिल्या.

Punyanagari, 19/09/2025

# व्हिएतनामच्या धर्तीवर लवकरच कोकणात काजू प्रक्रिया प्रकल्प : जयकुमार रावल



**पुणे : प्रतिनिधी**

व्हिएतनामच्या धर्तीवर संपूर्ण स्वयंचलित काजू प्रक्रिया प्रकल्प कोकणात उभारण्यासाठी नियोजन करावे, अशी सूचना राज्याचे पणनमंत्री तथा महाराष्ट्र राज्य काजू परिषदेचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी केली आहे.

पुणे येथे महाराष्ट्र राज्य काजू परिषदेच्या संचालक मंडळाच्या सभेत ते बोलत होते. या वेळी महाराष्ट्र राज्य काजू परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय कदम, मार्केटिंग फेडरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्रीधर दुबेपाटील, अपेडाचे उपसरव्यवस्थापक वाघमारे तसेच शासन नियुक्त संचालक रूपेश बेलोसे, डॉ. परशराम पाटील, धनंजय यादव उपस्थित होते.

रावल म्हणाले, कोकणामध्ये अपुऱ्या साठवणूक सुविधा असल्यामुळे ५००, १००० व ५००० मे. टन क्षमतेचे गोदाम प्रकल्प उभारण्यास मान्यता देण्यात आली असून, या माध्यमातून १.२५ लाख मे. टन क्षमतेचे गोदाम उभारण्यात येणार आहे. शासनाच्या मान्यतेने ५० टक्के अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल, असेही रावल म्हणाले.

रावल यांनी काजू फळप्रक्रिया विकास योजना २०२३ मधील काजू बोंड रसावरील सामाईक प्रक्रिया केंद्र उभारणी, जिल्हास्तरावर काजू प्रक्रियेकरिता आधुनिक मध्यवर्ती सुविधा केंद्राची उभारणी व ओले काजूगर काढणे व प्रक्रियेकरिता उभारण्यात येणाऱ्या प्रक्रिया केंद्राला अर्थसहाय्य देणेबाबतच्या योजना शासनाला सादर कराव्या, अशा सूचनाही केल्या. या वेळी व्हिएतनाम देशातील काजू प्रक्रिया प्रकल्पाच्या धर्तीवर कोकणामध्ये प्रकल्प, अपेडाच्या धर्तीवर काजू प्रक्रिया प्रकल्पांचे आधुनिकीकरणाबाबत आराखडा तयार करणे, कोल्हापूर, सिंधुदुर्ग व रत्नागिरी अर्थक्षम अहवाल तयार करणे व गोदाम योजना याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. कोकणातील काजू बोंडाचा उपयोग करून उपपदार्थ बनविणे. काजूपासून मूल्यवर्धित पदार्थ तयार करण्याबाबत चर्चा करण्यात आली; जेणेकरून काजू उत्पादक शेतकऱ्यांना मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये वाढ कशी होईल, याबाबत चर्चा करण्यात आली.

# राष्ट्रीय बाजाराची अधिसूचना १५ दिवसांत : पणनमंत्री रावल

ॲग्रोवन वृत्तसेवा

पुणे : गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत असलेल्या राज्यातील महत्त्वाच्या बाजार समित्यांना राष्ट्रीय करण्याच्या मसुद्याची अधिसूचना येत्या १५ दिवसांत काढणार असल्याची माहिती पणनमंत्री जयकुमार रावल यांनी गुरुवारी (ता.१८) दिली. या अधिसूचनेनंतर ज्या बाजार समित्या निकषात बसतील अशा बाजार समित्या राष्ट्रीय होऊन, संचालक मंडळे बरखास्त होणार आहेत.

केंद्र सरकारच्या २०१७ च्या पणन सुधारणांमध्ये बाजार समित्यांना राष्ट्रीय करण्याचे सूचित करण्यात आले आहे. मात्र गेल्या अनेक दिवसांपासून हा मसुदा राजकीयदृष्ट्या मागे पडला होता. मात्र नुकतेच राज्य मंत्रिमंडळाने बाजार समित्यांना राष्ट्रीय करण्याला मंजुरी दिली आहे. यानंतर याचा मसुदा विधी व न्याय विभागाकडे तपासणीसाठी पाठविण्यात आला आहे. या विभागाने देखील काही सुधारणा सांगितल्या होत्या. त्यानुसार सुधारणा करून पुन्हा अंतिम मान्यतेसाठी विधी विभागाला पाठविण्यात आल्याचे श्री. रावल यांनी सांगितले. त्यामुळे आता १५ दिवसांच्या आत राष्ट्रीय बाजाराची अधिसूचना निघणार असल्याचे श्री. रावल यांनी सांगितले.

दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दबावामुळे पुणे बाजार समितीला राष्ट्रीय बाजारातून वगळले का? या प्रश्नावर रावल म्हणाले, की अधिसूचना आणि कायद्यातील तरतुदींमध्ये ज्या बाजार समित्या निकषात बसतील त्या बाजार समित्यांना राष्ट्रीय करण्यात येणार आहे.

तर नुकतेच अजित पवार यांनी पुणे बाजार समितीच्या संचालकांना तुम्ही नीट कामे करा, स्वतःमध्ये सुधारणा करा, नाही तर राष्ट्रीय बाजारात तिसरा नंबर तुमचा असेल असा दम दिला होता. त्यामुळे आता पुणे बाजार समिती राष्ट्रीय बाजाराच्या निकषात बसणार की वगळणार, याकडे बाजार समिती घटकांचे लक्ष लागले आहे.

Pudhari, 18/09/2025

# शेतमाल निर्यातवाढीसाठी सुविधा केंद्रे सक्षम करा



पणन मंडळाच्या बैठकीत मार्गदर्शन करताना पणनमंत्री जयकुमार रावल व उपस्थित संचालक.

- पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या सूचना
- बाजार समित्यांनी १० वर्षाचा व्यवसाय आराखडा करावा
- महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, संचालक मंडळाची बैठक संपन्न

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील फळे, भाजीपाला व इतर शेतमाल निर्यातीमध्ये वाढ करून शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे. त्यासाठी शेतमालाचे नुकसान टाळून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापराद्वारे भाजीपाला व फळे निर्यात वाढ करणे गरजेचे आहे. त्यासाठी शेतमाल निर्यात सुविधा केंद्रांनी तत्परतेने काम करावे. त्यासाठी राज्यातील निर्यात सुविधा केंद्रे सक्षम करून ती पूर्ण क्षमतेने अखंड सुरू ठेवण्याच्या सूचना राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिले.

मार्केट यार्डात महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या संचालक मंडळाची बैठक रावल यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि.१७) पार पडली. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी आमदार चरणसिंग ठाकूर, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे सभापती प्रवीण नहाटा, दोडाईचा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, मलकापूरचे संजय काजळे-पाटील, सहकार आयुक्त दीपक तावरे, विपणन व तपासणी संचालनालयाचे विपणन अधिकारी व्ही. एस. यादव, पणन संचालक विकास रसाळ, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, मुख्य व्यवस्थापक विनायक कोकरे, नाबार्डचे उप महाप्रबंधक हेमंत कुंभारे आदी उपस्थित होते.

या बैठकीत बाजार समित्यांचे कर्ज मागणी प्रस्ताव, अंशदान आणि कर्ज वसुली, एकरकमी परतफेड योजना, प्रशिक्षण योजना, देशांतर्गत व्यापार विकास, स्मार्ट प्रकल्प, बाजार समिती बळकटीकरण, काजू फळबाग प्रक्रिया प्रकल्प आदी विषयाबाबत चर्चा करण्यात आली.

### पणनमंत्री रावल म्हणाले...

- बाजार समित्यांनी आगामी १० वर्षाचा व्यवसाय विकास आराखडा तयार करावा. राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समितीचे १०० टक्के संगणकीकरण करण्यात यावे. त्यासाठी समित्यांना पणन मंडळाच्या वतीने प्रोत्साहन देण्यात येईल.
- जागतिक दर्जाच्या पणन सुविधांचा विचार करून ठाणे जिल्ह्यातील बापगाव आणि नागपूर जिल्ह्यातील काळडोंगरी येथील जागा विकसनासाठी प्रकल्प अहवाल तयार करावा.
- केंद्राच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा अधिकाधिक लाभ कृषी उत्पन्न बाजार समितीला मिळण्यासाठी कार्यवाही करावी.
- बाजार समित्यांकडील अंशदान व कर्जवसुली झाल्याशिवाय त्यांना पणनकडून इतर परवानग्या देऊ नये. वसुली नियमित होण्याकरिता पणन मंडळाने आढावा घेऊन एकरकमी कर्ज परतफेड धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करावी.
- राज्यातील मॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्राचा शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणात लाभ घ्यावा. काजू सोलरबेस ड्राय काजू प्रक्रिया केंद्र प्रकल्प तयार करा. शेतमालाचे अधिकाधिक निर्यातीकरणाच्या दृष्टीने नवीन योजना तयार कराव्यात.
- राज्यात शेतमालाच्या बाजारभावबद्दल अफवा पसरवल्या जातात व शेतमालाचे भाव पडण्याचा प्रयत्न केला जातो. त्यास आळा घालण्यासाठी बाजार समित्यांनी खोट्या अफवांचे प्रसिद्धी माध्यमांतून खंडन करावे, जेणेकरून बाजारभावावर परिणाम होणार नाही.

### पणनमंत्री रावल यांचे निर्देश; राज्य कृषी पणन मंडळाची बैठक

# निर्यात सुविधा केंद्र सक्षम करा

**पुणे,** शहर प्रतिनिधी. राज्यातील फळे, भाजीपाला व इतर शेतमाल निर्यात वृद्धी करून शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे, शेतमालाचे नुकसान टाळण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा. भाजीपाला व फळे निर्यात करण्यासाठी जगात ज्या बाजारपेठेत मागणी त्याचा अभ्यास करून तेथे निर्यात करण्यासाठी सुविधा केंद्रांनी तत्परतेने काम करावे. भौगोलिक मानांकनानुसार राज्यातील फळांचे ब्रँडिंग करावे.निर्यात मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात यावे. राज्यातील निर्यात सुविधा केंद्र सक्षम करून ही सुविधा केंद्रे पूर्ण क्षमतेने २४x७ सुरु ठेवावेत, असे निर्देश राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिले.

पुणे येथील महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ संचालक मंडळाच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार चरणसिंग ठाकूर, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे सभापती प्रविणकुमार नहाटा, दोडाईचा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, मलकापूरचे संजय काजळे-पाटील, सहकार आयुक्त दीपक तावरे, विपणन व तपासणी संचालनालयाचे विपणन अधिकारी व्ही. एस. यादव, कृषी पणन संचालक विकास रसाळ, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, मुख्य व्यवस्थापक विनायक कोकरे, नाबार्डचे उप महाप्रबंधक हेमंत कुंभारे आदी उपस्थित होते.

## धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करा

कृषी उत्पन्न बाजार समिती समित्याकडील अंशदान व कर्जवसुली झाल्याशिवाय इतर परवानग्या देवू नये, वसुली नियमित होईल याकरीता मंडळाने आढावा घ्यावा, एकरकमी कर्ज परतफेड धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करावी. केंद्राच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा अधिकाधिक लाभ कृषी उत्पन्न बाजार समितीला मिळण्याच्यादृष्टीने कार्यवाही करावी, अशी सूचना त्यांनी केली.

## समित्यांचे संगणकीकरण

रावल म्हणाले, शेतकऱ्यांच्या शेतमालाला स्पर्धात्मक दर देण्यासाठी जागतिक बाजार व्यवस्थेचा अभ्यास करावा. राज्यात उत्पादित होणाऱ्या फळे व भाजीपाला उत्पादनाला जगाच्या बाजारपेठेत जेथे मागणी असेल तेथे निर्यात करण्यासाठी सुविधा केंद्रांनी तत्परतेने काम करावे.तसेच पणन सुविधा सक्षम करून प्रभावीपणे काम करणाऱ्या राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या पाठीशी सरकार सक्षमपणे उभे आहे. राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समितीचे १०० टक्के संगणकीकरण करण्यात यावे.

## बाजार समित्यांनी अफवांचे खंडन करावे

प्रत्येक फळाच्या हंगामाच्या वेळी त्याची भौगोलिक वैशिष्ट्ये असलेली माहिती व जाहिरात करावी.राज्यात शेतमालाच्या बाजारभावबद्दल अफवा पसरवल्या जातात व शेतमालाचे भाव पडण्याचा प्रयत्न केला जातो.यावर आळा घालण्यासाठी बाजार समित्यांनी खोट्या अफवांचे प्रसिद्धी माध्यमांतून खंडन करावे,जेणे करून बाजार भावावर परिणाम होणार नाही. या बैठकीत कर्ज मागणी प्रस्ताव, अंशदान आणि कर्ज वसुली, एक रकमी परतफेड योजना, प्रशिक्षण योजना, देशांतर्गत व्यापार विकास, स्मार्ट प्रकल्प, बाजार समिती बळकटीकरण, काजू फळबाग प्रक्रिया प्रकल्प आदी विषयाबाबत चर्चा करण्यात आली.

MAGZTER @heshi
Clipped from - Navarashtra Pune - September 18, 2025
Read it digitally on the Magzter app

# 'शेतीमाल निर्यात सुविधा केंद्र सक्षम करा'

अॅग्रोवन वृत्तसेवा



जयकुमार रावल

पुणे : ''भाजीपाला व फळे निर्यात करण्यासाठी जगात ज्या बाजारपेठेत मागणी आहे, त्याचा अभ्यास करून तेथे निर्यात करण्यासाठी सुविधा केंद्रांनी तत्परतेने काम करावे. भौगोलिक मानांकोनानुसार राज्यातील फळांचे ब्रँडिंग करावे. राज्यातील निर्यात सुविधा केंद्र सक्षम करून ती पूर्ण क्षमतेने सुरू ठेवावीत,'' असे निर्देश राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिले.

पुणे येथील महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ संचालक मंडळाच्या बैठकीत ते बुधवारी (ता.१७) बोलत होते. या वेळी आमदार चरणसिंग ठाकूर, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे सभापती प्रवीणकुमार नहाटा, दोडाईचा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, मलकापूरचे संजय काजळे-पाटील, सहकार आयुक्त दीपक तावरे, विपणन व तपासणी संचालनालयाचे विपणन अधिकारी व्ही. एस. यादव, कृषी पणन संचालक विकास रसाळ, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सर व्यवस्थापक विनायक कोकरे, नाबार्डचे उप महाप्रबंधक हेमंत कुंभारे आदी उपस्थित होते.

या बैठकीत कर्ज मागणी प्रस्ताव, अंशदान आणि कर्ज वसुली, एक रकमी परतफेड योजना, प्रशिक्षण योजना, देशांतर्गत व्यापार विकास, स्मार्ट प्रकल्प, बाजार समिती बळकटीकरण, काजू फळबाग प्रक्रिया प्रकल्प आदी विषयाबाबत चर्चा करण्यात आली.

श्री. रावल म्हणाले, की राज्यातील फळे, भाजीपाला व इतर शेतीमालाची निर्यात वृद्धी करून शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण करण्याकरिता राज्य सरकार प्रयत्नशील आहे. शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला स्पर्धात्मक दर देण्यासाठी जागतिक बाजार व्यवस्थेचा अभ्यास करावा. राज्यात उत्पादित होणाऱ्या फळे व भाजीपाला उत्पादनाला जगाच्या बाजारपेठेत जेथे मागणी असेल तेथे निर्यात करण्यासाठी सुविधा केंद्रांनी तत्परतेने काम करावे. तसेच पणन सुविधा सक्षम करून प्रभावीपणे काम करणाऱ्या राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या पाठीशी सरकार सक्षमपणे उभे आहे. अशा बाजारसमित्याना अधिक काम करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येईल. बाजार समितीच्या क्षेत्रीय पीकपद्धती, त्यादृष्टीने उपलब्ध पायाभूत सुविधा, आधुनिकीकरणाची गरज, भविष्यात आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधांचा अभ्यास करुन आगामी १० वर्षांचा व्यवसाय विकास आराखडा तयार करावा. बाजार समितीने ५, १० आणि १५ एकर जागेत बाजारपेठ निर्मितीकरिता विविध पायाभूत सुविधांचा समावेश करुन आदर्श पायाभूत आराखडा तयार करा.''

## बैठकीतील महत्त्वाचे मुद्दे

- राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समितीचे १०० टक्के संगणकीकरण करण्यात यावे.
- मॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत राज्यात फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्र निर्माण करण्यात आले असून शेतकऱ्यांना त्याचा मोठ्या प्रमाणात लाभ झाला पाहिजे.
- काजू सोलरबेस ड्राय काजू प्रक्रिया केंद्र प्रकल्प तयार करा. शेतीमालाचे अधिकाधिक निर्यातीकरणाच्या दृष्टीने नवीन योजना तयार करावा.
- प्रत्येक फळाच्या हंगामाच्या वेळी त्याची भौगोलिक वैशिष्ट्ये असलेली माहिती व जाहिरात करावी.
- बाजार समित्यांनी खोट्या अफवांचे प्रसिद्धी माध्यमांतून खंडन करावे.

Pune, Main
18/09/2025 Page No. 3

पुण्य नगरी

# बाजार समिती सभापती-उपसभापतींचे मानधन, भत्ते वाढले

## बाजार समित्यांच्या उत्पन्नाचे निकष बंधनकारक : सर्वाधिक २५ हजार आणि सर्वात कमी ५ हजारांची वाढ

**। पुणे :** राज्यातील बाजार समित्यांच्या सभापती-उपसभापतींच्या मानधनात आणि भत्त्यांमध्ये मोठी वाढ करण्यात आली आहे. मात्र, ही वाढ करत असताना बाजार समित्यांच्या उत्पन्नाचे निकष ठेवण्यात आले आहेत. पणन संचालकांच्या नव्या निर्णयानुसार आता बाजार समित्यांच्या उत्पन्नानुसार सर्वाधिक २५ हजार आणि सर्वात कमी ५ हजार रुपयांची वाढ झाली आहे, तर या अगोदर हे मानधन १० हजार आणि १ हजार २५० एवढे होते.

याबाबतची पणन संचालक विकास रसाळ यांनी सांगितले की, राज्यातील बाजार समिती संघाच्या वतीने सातत्याने सभापती आणि उपसभापतींच्या मानधनाची मागणी केली जात होती. २०१९ च्या निर्णयानुसार सर्वाधिक मानधन हे १० हजार रुपये, तर सर्वात कमी १ हजार २५० रुपये एवढे होते. मात्र, आता हे मानधन २५ हजार आणि ५ हजार रुपये करण्यात आले आहे. मानधनाच्या रकमेमध्ये बाजार समित्यांच्या उत्पन्नाची अट ठेवण्यात आली आहे.

उत्पन्नाच्या अटीनुसार, २५ कोटींपेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या सभापतींना २५ हजार, तर उपसभापतींना १२ हजार ५०० रुपयांची वाढ केली आहे, तर १० कोटी ते २५ कोटी उत्पन्न असणाऱ्या समिती सभापतींना २२ हजार आणि उपसभापतींना ११ हजार मानधन मिळणार आहे.

### बाजार समिती उत्पन्नानुसारचे मानधन

| उत्पन्नाची मर्यादा | सभापती | उपसभापती |
|---|---|---|
| २५ कोटींपेक्षा अधिक | २५ हजार | १२ हजार ५०० |
| १० ते २५ कोटी | २२ हजार | ११ हजार |
| ५ ते १० कोटी | १९ हजार | ९ हजार ५०० |
| २.५ ते ५ कोटी | १६ हजार | ८ हजार |
| १ ते २.५ कोटी | १३ हजार | ६ हजार ५०० |
| ५० लाख ते १ कोटी | १० हजार | ५ हजार रुपये |
| २५ ते ५० लाख | ७ हजार ५०० | ३ हजार ७५० |
| २५ लाखांपेक्षा कमी | ५ हजार | २ हजार ५०० |

Pune Edition
Sep 17, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

Agrowon, 17/09/2025

# भारताचा कृषी विकासदर जागतिक स्तरावर सर्वाधिक

## केंद्रीय कृषिमंत्री चौहान यांचा दावा : रब्बी नियोजनासाठी राष्ट्रीय परिषद

**नवी दिल्ली** : वर्ष २०२५-२६च्या पहिल्या तिमाहीत भारताच्या कृषी क्षेत्राचा विकासदर ३.७ टक्के नोंदवला गेला, तो जागतिक स्तरावर सर्वाधिक आहे, असा दावा केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी येथे केला.



"गेल्या वर्षी याच कालावधीत नोंदविलेल्या १.५ टक्का वाढीच्या तुलनेत कृषी क्षेत्राच्या कामगिरीत लक्षणीय सुधारणा झाली आहे. केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या कल्याणाला प्राधान्य देत राहील," असे ते म्हणाले.

देशातील रब्बी (हिवाळी) हंगामाच्या (२०२५-२६) पूर्वनियोजनासाठी आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय कृषी परिषदेस सोमवारी (ता. १६) प्रारंभ झाला. या प्रसंगी उद्घाटन सत्रात बोलताना केंद्रीय कृषिमंत्री चौहान यांनी कृषी क्षेत्रात एकत्रित प्रयत्न आणि भागीदारी वाढविण्यासाठी 'एक राष्ट्र, एक शेती आणि एक संघ' ही संकल्पना एक महत्त्वाचा उपक्रम असल्याचे सांगितले. ते म्हणाले, "देशातील कृषी क्षेत्र ३.७ टक्के दराने वाढत आहे, जे जगातील सर्वाधिक आहे, हे शेतकऱ्यांचे, शास्त्रज्ञांचे कठोर परिश्रम व सरकारच्या शेतकरी-अनुकूल धोरणांमुळे आहे."

कृषी विस्तार कार्याचे महत्त्व अधोरेखित करताना कृषिमंत्री चौहान म्हणाले, "कृषी विस्तार कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. याकरिता राज्य सरकारे, कृषी विद्यापीठे आणि कृषी विज्ञान केंद्रांनी ठोस कार्यक्रम आणि धोरणे विकसित करावीत. देशाच्या कृषी क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारे एकत्रितपणे काम करत आहेत."

हवामानातील वाढती अनिश्चित परिस्थिती लक्षात घेता, शेतकऱ्यांना पीकविमा घेण्याचे आवाहन मंत्र्यांनी केले. "शेतकऱ्यांना दिलासा मिळावा म्हणून पंतप्रधान पीकविमा योजना प्रभावीपणे राबवली पाहिजे," अशा सूचना त्यांनी राज्यातून आलेल्या प्रतिनिधींना केल्या. तसेच बनावट कृषी निविष्ठांबद्दल केंद्र सरकार लक्ष ठेवून असल्याचे सांगत कृषिमंत्री चौहान म्हणाले, "आम्ही शेतकऱ्यांचे शोषण होऊ देणार नाही. बनावट खते, बियाणे आणि कीटकनाशकांचे उत्पादक आणि विक्रेत्यांवर कठोर कारवाई केली जाईल." परिषदेत रब्बी २०२५-२६ हंगामासाठी तयारी, उत्पादन लक्ष्य आणि व्यापक धोरणांवर विस्तृत चर्चा करण्यात आली.

### 'विकसित कृषी'चा दुसरा टप्पा सुरू होणार

खरिपातील पहिल्या टप्प्यानंतर, रब्बी हंगामाच्या दुसरा टप्प्याकरिता 'विकसित कृषी संकल्प अभियाना'चे ३ ते १८ ऑक्टोबर दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. केंद्रीय कृषिमंत्री चौहान यांच्या नेतृत्वाखाली हे अभियान सुरू होणार आहे. या अभियानांतर्गत रब्बी हंगामातील पिकांसाठी देशभरातील कृषी शास्त्रज्ञ गावागावांत जाऊन शेतकऱ्यांची भेट घेऊन पीकविषयक माहिती देतील. त्यांच्या समस्या ऐकून त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणार आहेत.

> कृषी संशोधन केवळ शैक्षणिक प्रकाशनांवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी शेतकऱ्यांच्या वास्तविक जगातील आव्हानांना तोंड देण्याकडे शास्त्रज्ञ आणि विद्यापीठांनी वळले पाहिजे.
>
> **- शिवराजसिंह चौहान,**
> केंद्रीय कृषिमंत्री

पुढारी

# बाजार समित्यांच्या सभापती, उपसभापतींच्या मानधनात वाढ

**पणन संचालक विकास रसाळ यांच्याकडून परिपत्रक जारी**

**■ दैनिक भत्ता, बैठक भत्ता दरही वाढविल्याने दिलासा**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील ज्या कृषी उत्पन्न बाजार समित्या गतवर्षी वाढाव्यामध्ये आहेत, अशा बाजार समित्यांचे सभापती, उपसभापतींच्या दरमहाच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय पणन संचालक विकास रसाळ यांनी घेतला आहे. याशिवाय दैनिक भत्ता आणि बैठक भत्ता दरही वाढविण्यामुळे संबंधितांना दिलासा मिळाला असून, गतवर्षी तोट्यात असणाऱ्या बाजार समित्यांना या वाढीमधून वगळण्यात आले आहे.

पणन संचालनालयाने यापूर्वी २०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार बाजार समित्यांच्या सभापती, उपसभापतींच्या मानधनात वाढ केली होती. त्याचा विचार करून नवीन परिपत्रक १५ सप्टेंबर रोजी रसाळ यांनी जारी केले आहे.

अ वर्ग बाजार समित्यांसाठी पूर्वी एक कोटी रुपये वार्षिक उत्पन्न निश्चित होते. आता उत्पन्नाचे मानधन देण्यासाठी अ वर्गात पाच टप्पे केले आहेत. 'अ' वर्गासह नवीन टप्प्यातील बाजारसमित्यांतील सभापती, उपसभापतींच्या मानधनात भरीव वाढ झाली आहे.

परिपत्रकान्वये आता बाजार समिती सदस्यांना दैनिक भत्ता ग्रामपंचायत क्षेत्रात ७०० रुपये (४०० वाढ), नगरपालिका क्षेत्र एक हजार रुपये (५५० वाढ), महानगरपालिका क्षेत्र १५०० (९०० वाढ), राज्याबाहेरील क्षेत्र २ हजार रुपये (१२५० वाढ) भत्ता करण्यात आला आहे. याशिवाय सभा बैठक भत्ता दर हे उत्पन्न मर्यादेनुसार शंभर लाखांच्यावर आता २ हजार रुपये, ५० लाख ते १०० लाखापर्यंत १५०० रुपये, २५ लाख ते ५० लाखापर्यंत १ हजार रुपये आणि २५ लाखांपेक्षा कमी उत्पन्न मर्यादेत ७०० रुपये निश्चित करण्यात आले आहेत.

**कृषी उत्पन्न बाजार समित्या : सभापती-उपसभापती मानधन दर**

| क्र. | वर्ग | गतवर्ष वार्षिक उत्पन्नमर्यादा | सभापती | उपसभापती |
|---|---|---|---|---|
| १. | अ***** | २५ कोटींपेक्षा जास्त | २५,००० | १२,५०० |
| २. | अ **** | १० कोटी ते २५ कोटी | २२,००० | ११,००० |
| ३. | अ *** | ५ कोटी ते १० कोटी | १९,००० | ९,५०० |
| ४. | अ ** | २.५ कोटी ते ५ कोटी | १६,००० | ८,००० |
| ५. | अ * | १ कोटी ते २.५ कोटी | १३,००० | ६,५०० |
| ६. | ब | ५० लाख ते १ कोटी | १०,००० | ५,००० |
| ७. | क | २५ लाख ते ५० लाख | ७,५०० | ३,७५० |
| ८. | ड | २५ लाखापेक्षा कमी | ५,००० | २५०० |

राज्यातील कृषी उत्पन्न पदाधिकारी, संचालकांचे मानधन, भत्ता वाढ करण्यासाठी बाजार समिती संघाचे सभापती प्रवीण नाहाटा व संचालक मंडळाने पणन संचालनालयाकडे सतत पाठपुरावा केला होता. त्यानुसार त्यास यश आले असून, बाजार समित्यांना दिलासा मिळाला आहे. राज्यात ३०६ बाजार समित्या असून, गतवर्षी सुमारे १९१ बाजार समित्या या वाढाव्यामध्ये राहिलेल्या आहेत. 'ड' वर्गात ३६ बाजार समित्या आहेत. पणन संचालकांनी घेतलेल्या निर्णयावर आम्ही समाधानी असून, परिपत्रकाचे स्वागत करतो.

- **किशोर कुलकर्णी,**
कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ, पुणे.

Pune Edition
Sep 16, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

Agrowon, 16/09/2025

# सांगली जिल्ह्यातून भाजीपाला, फळांची ६४ हजार टन निर्यात

## गतवर्षीच्या तुलनेत आठ हजार टनांनी वाढ

अ‍ॅग्रोवन वृत्तसेवा

सांगली : सांगली जिल्ह्याच्या शेतीमालाने आता जागतिक बाजारपेठ काबीज केली आहे. गेल्या वर्षभरात जिल्ह्यातून तब्बल ६४ हजार १४६.४० टन फळे आणि भाजीपाल्याची निर्यात झाली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा आठ हजार ३७७.९२ टनांची निर्यात वाढली आहे. जिल्ह्यातून एक लाख टन भाजीपाला आणि फळांची निर्यात करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आल्याची माहिती कृषी विभागाने दिली.

जिल्ह्यातून २०२३-२४ या वर्षात ११ हजार ६१७ शेतकऱ्यांनी निर्यात करण्यासाठी नोंदणी केली असून ६७३५ हेक्टरवरील द्राक्ष, डाळिंब, आंबा, भाजीपाला यासह अन्य पिकांची निर्यात केली आहे. गतवर्षी ५५ हजार ७६८.४८ टन केळी, डाळिंब, द्राक्षे, मिरची, मका, आंबा, बेबी कॉर्न, वाटाणा, हळद, भाजीपाल्याची निर्यात केली होती.

जागतिक बाजारपेठेत चांगला दर मिळत असल्यामुळे जिल्ह्यातून निर्यातीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. प्रामुख्याने द्राक्ष निर्यात मोठ्या प्रमाणात होत आहे. २०२४-२५ या वर्षात जिल्ह्यातही १३ हजार ४७५ शेतकऱ्यांनी ८०२७ हेक्टरवरील पिकांची निर्यात करण्यासाठी नोंदणी केली होती. गतवर्षी ६४ हजार १४६.४० निर्यात झाली. २०२३-२४ पेक्षा गतवर्षी आठ हजार ३७७.९२ टनांनी निर्यातीत वाढ झाली आहे. द्राक्ष, डाळिंब, केळी, मका, आंबा, मिरची आणि बेबी कॉर्न गल्फ देश, युरोप, आशिया आणि आफ्रिकेतील बाजारपेठांमध्ये निर्यात होऊ लागली आहे. जिल्ह्यातून जवळपास एक लाख टनांनी शेतीमाल निर्यातीचे जिल्हा प्रशासनाचे उद्दिष्ट आहे, असे कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

**जिल्ह्यातून भाजीपाला, फळांच्या निर्यातीवर दृष्टिक्षेप (टन)**

| पीक | वर्ष २०२३-२४ | वर्ष २०२४-२५ |
|---|---|---|
| केळी | ६० | १३८२ |
| मिरची | २०८ | १६७ |
| डाळिंब दाणे | ३८४ | २३४३ |
| द्राक्ष | १९२७९ | १८११२ |
| मका, मका रवा | ३१०५७ | ३२४२६ |
| आंबा | ५०४ | ६९ |
| बेबी कॉर्न, वाटाणा | ९५१ | ४६४५ |
| तांदूळ | ३०६ | ४१९ |
| हळद | २७३९ | ३९८२ |
| भाजीपाला | २ | १२१ |
| इतर | २८२ | ४८१ |



> शेतीमाल निर्यातीसाठी आम्ही सातत्याने प्रोत्साहन देत आहोत. यामुळे द्राक्ष, डाळिंब, केळी, मका, आंबा, मिरची आणि बेबी कॉर्नच्या निर्यातीत वाढ झाली आहे. शेतीमाल प्रक्रिया उद्योग वाढवण्यासाठीही कृषी विभागाकडून विशेष प्रयत्न सुरू आहेत. जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली निर्यातीला चालना देण्यासाठी विविध उपाययोजना राबवल्या जात आहेत.
>
> **- विवेक कुंभार,** जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सांगली

Agrowon, 16/09/2025

# बाजार समिती सभापती, उपसभापतिंच्या मानधनात वाढ

## सर्वाधिक २५ तर सर्वांत कमी ५ हजार रुपयांची वाढ

ॲग्रोवन वृत्तसेवा

**बाजार समिती उत्पन्नानुसार मिळणारे मानधन**

| उत्पन्नाची मर्यादा | सभापती | उपसभापती |
|---|---|---|
| २५ कोटींपेक्षा अधिक | २५ हजार | १२ हजार ५०० |
| १० ते २५ कोटी | २२ हजार | ११ हजार |
| ५ ते १० कोटी | १९ हजार | ९ हजार ५०० |
| २.५ ते ५ कोटी | १६ हजार | ८ हजार |
| १ ते २.५ कोटी | १३ हजार | ६ हजार ५०० |
| ५० लाख ते १ कोटी | १० हजार | ५ हजार |
| २५ ते ५० लाख | ७ हजार ५०० | ३ हजार ७५० |
| २५ लाखांपेक्षा कमी | ५ हजार | २ हजार ५०० |

पुणे : राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या सभापती, उपसभापतिंच्या मानधनात आणि भत्त्यांमध्ये मोठी वाढ करण्यात आली आहे. मात्र ही वाढ करताना बाजार समित्यांच्या उत्पन्नाने निकष ठेवण्यात आले आहेत. पणन संचालकांच्या नव्या निर्णयानुसार, आता बाजार समित्यांच्या उत्पन्नानुसार सर्वाधिक २५ हजार आणि सर्वांत कमी ५ हजार रुपयांची वाढ केली आहे. तर या अगोदर हे मानधन १० हजार आणि १ हजार २५० एवढे होते. या बाबतची माहिती पणन संचालक विकास रसाळ यांनी दिली.

श्री. रसाळ म्हणाले, "बाजार समिती संघाच्या वतीने सातत्याने सभापती आणि उपसभापतिंच्या मानधनाची मागणी केली जात होती. २०१९ च्या निर्णयानुसार सर्वाधिक मानधन १० हजार रुपये तर सर्वांत कमी १ हजार २५० रुपये एवढे होते. मात्र आता हे मानधन २५ हजार आणि ५ हजार रुपये करण्यात आले आहे. मानधनाच्या रकमेमध्ये बाजार समित्यांच्या उत्पन्नाची अट ठेवण्यात आली आहे."

उत्पन्नाच्या अटीनुसार २५ कोटींपेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या सभापतींना २५ हजार तर उपसभापतींना १२ हजार ५०० रुपयांची वाढ करण्यात आली आहे. तर त्याखालोखाल १० कोटी ते २५ कोटी उत्पन्न असणाऱ्या समिती सभापतींना २२ हजार आणि उपसभापतींना ११ हजार मानधन् मिळणार आहे.

# शेतकरी-ग्राहक यांच्यातील दुवा मजबूत करण्याचा प्रयत्न

## जयकुमार रावल : चिचोंडी पाटील उपबाजाराचे भूमिपूजन

ॲग्रोवन वृत्तसेवा



जयकुमार रावल

अहिल्यानगर : "कृषी विकासाला प्राधान्य देत राज्यात पणन व्यवस्था सक्षम करण्यासाठी नियोजनबद्ध आराखडा तयार करण्यात आला आहे. यातून शेतकरी व ग्राहक यांच्यातील दुवा मजबूत करून थेट विक्रीची व्यवस्था पणन मंडळाच्या माध्यमातून करण्यात येत आहे," असे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले. अहिल्यानगर येथे दीड कोटी रुपयांचा संत तुकडोजी महाराज शेतकरी भवन उभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

अहिल्यानगर येथील दादा पाटील शेळके कृषी बाजार समितीच्या चिचोंडी पाटील येथे उपबाजार समितीच्या इमारत कामाचे भूमिपूजन श्री. रावल यांच्या हस्ते झाले. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील होते. जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष, आमदार शिवाजी कर्डिले, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, माजी मंत्री बबनराव पाचपुते, माजी सभापती भानुदास कोतकर, सभापती भाऊसाहेब बोठे, उपसभापती रभाजी सूळ, सचिव अभय भिसे, दिलीप भालसिंग, युवक नेते अक्षय कर्डिले, जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे, रावसाहेब शेळके, सचिन जगताप यांच्यासह बाजार समितीचे संचालक, शेतकरी उपस्थित होते.

श्री. रावल म्हणाले, "देशात २ हजार ६०० बाजार समित्या असून त्यापैकी सर्वाधिक ३०६ समित्या व ६२१ उपबाजार आपल्या महाराष्ट्रात आहेत. अडीच लाख टन मालाची विक्री होऊन ८५ हजार कोटी रुपयांचा व्यवहार या माध्यमातून होतो. या बाजार आवारात ६ लाख टन क्षमतेची १ हजार १६८ गोदामे आहेत. राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून १०८ गोदामे उभारून १ लाख टन अतिरिक्त साठवण क्षमता निर्माण करण्यात आली आहे. फ्रान्समधील सर्वांत मोठ्या बाजार समितीसोबत शासनाने करार केला असून त्यांच्या सहकार्याने जगातील सर्वांत मोठी बाजारपेठ -महामुंबई आंतरराष्ट्रीय कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन होणार आहे.

पुढारी

पुढारी ANCHOR

# बापगावला उभारणार अत्याधुनिक शेतमाल निर्यात सुविधा केंद्र

- निर्यातक्षम दहा सुविधांच्या उभारणीसाठी २८६ कोटींचा प्रकल्प
- स्मार्ट प्रकल्पांतर्गत पणन मंडळाकडून साकारतोय ठाण्यात महत्त्वाचा प्रकल्प


## पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या सूचनांनुसार प्रकल्पाची आखणी

पुढारी वॉच

किशोर बरकाले

पुढारी प्रतिनिधी

पुणे : राज्यात जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पाची (स्मार्ट) अंमलबजावणी सुरू आहे. त्या अंतर्गत भिवंडी तालुक्यातील बापगाव (जि. ठाणे) येथे राज्य कृषी पणन मंडळाचा वाशीच्या धर्तीवर अत्याधुनिक व अधिक क्षमतेचे निर्यात सुविधा केंद्र उभारण्याचे निश्चित झाल्याची माहिती मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली. शेतीमाल निर्यातक्षमच्या विविध दहा सुविधांच्या या महत्त्वपूर्ण प्रकल्पाची किंमत २८६ कोटी ८४ लाख रुपयांइतकी असल्याचे त्यांनी सांगितले.




स्मार्ट प्रकल्पातंर्गत पणन मंडळाकडून बापगाव (जि. ठाणे) येथे उभारण्यात येणाऱ्या निर्यात सुविधा केंद्राचे संकल्पचित्र.

### फळे व भाजीपाल्याच्या निर्यात वृध्दीसाठी १० पायाभूत सुविधा

बापगांव येथे मूळ प्रकल्पानुसार फळे व भाजीपाल्याच्या निर्यात वृद्धीसाठी १० पायाभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत. त्या पैकी पहिल्या टप्प्यात ४ सुविधांचा समावेश आहे. त्यामध्ये विविध फळे व भाजीपाला हाताळणीकरिता पॅकहाऊस, उष्ण पाणी प्रक्रिया (हॉट वॉटर ट्रिटमेंट) व उष्ण बाष्प प्रक्रिया (व्हेपर हीट ट्रीटमेंट) केंद्राचा समावेश असून या निर्यात सुविधा केंद्रांच्या उभारणीसाठी ९८ कोटी १६ लाख रुपये मंजूर असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच इतर सुविधा, पॅक हाऊस, प्रयोगशाळा, विमानतळावर एक्स-रे मशीन, अन्य शेतमाल निर्यात सुविधा केंद्राचा समावेश असल्याचे सांगण्यात आले.

पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या सूचनांनुसार या प्रकल्पाची आखणी करण्यात आली आहे. त्यासाठी बापगाव येथील सुमारे ९२ एकरच्या पहिल्या टप्प्यात निर्यात सुविधा केंद्रे १५ एकरवर सुरू करण्याचे नियोजित आहे. मंडळाच्या वाशी येथील एक एकरच्या अपुऱ्या जागेमुळे वाहतुकीची अडचण आहे. शिवाय कमी क्षमतेमुळे २४ तास सुविधा केंद्र सुरू ठेवावी लागतात. तुलनेने बापगांव येथे वाहनांमधील मालाच्या लोडिंग-अनलोडिंगसह प्रशस्त जागा उपलब्ध होणार असल्याने सुविधांचा तत्काळ व योग्य वापर, वाहतुकीस सुलभता आणि वाशी केंद्राच्या चौपट क्षमता ही बापगांव केंद्रात उपलब्ध होणार असल्याने शेतमाल निर्यातीला आणखी गती मिळून शेतकऱ्यांना फायदा अपेक्षित आहे.

**मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांची माहिती**

जागतिक बँकेने स्मार्ट अंतर्गत हा प्रकल्प सुचविला असून बँक अधिकाऱ्यांनी स्वतः पाहणी करून, प्रकल्पाचे डिझाईनही अंतिम केलेले आहे. या निर्यात सुविधांच्या पायाभूत सुविधा उभारणीबाबत जागतिक बँकेच्या २५ फेब्रुवारी २०२५ च्या बैठकीत मान्यता देण्यात आली असून मार्च २०२७ अखेर हा प्रकल्प कार्यान्वित होईल. मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालांतर्गत पहिल्या टप्प्यात सुमारे १३० कोटींची तरतूद आहे. त्यातून चार प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार आहेत. आयातदार देशांना शेतमालावर करावयाच्या आवश्यक त्या प्रक्रिया उभारण्यात येत असून मंडळाच्या वाशी येथील सुविधा केंद्रांवर त्या उपलब्ध आहेत.

Pune Edition
Sep 12, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

# उळे शेतकरी कंपनीची ओमानला केळी निर्यात

## पहिल्यांदाच निर्यात करून जागतिक बाजारपेठेत प्रवेश ; निर्यातक्षम उत्पादन वाढीचा प्रयत्न

अॅग्रोवन वृत्तसेवा

सोलापूर : दक्षिण सोलापूर तालुक्यातील उळे येथील उळे शेतकरी कंपनीने ओमानला केळीची पहिल्यांदाच निर्यात करून जागतिक बाजारपेठेत प्रवेश केला आहे. वेग्रो कंपनीच्या सहकार्याने शेतकरी उत्पादक कंपनीने २० टन केळीची निर्यात केली. या भागातील शेतकऱ्यांना यानिमित्ताने जागतिक बाजारात प्रवेशाची संधी मिळाली आहे.

उळे येथील बहुतांश शेतकरी द्राक्ष उत्पादन घेतात. मात्र त्यांना त्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करूनही द्राक्ष काढणीनंतरच्या समस्यांना तोंड द्यावे लागत होते. शीतगृह, पॅकिंग हाऊस नसल्यामुळे व्यापाऱ्यांना आणि स्थानिक बाजारात कमी दरात द्राक्ष विकावे लागत होते. शिवाय त्यासाठी अन्य जिल्ह्यात द्राक्ष न्यावे लागत होते. त्यावर मात करण्यासाठी २०१७ मध्ये उळे शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना करण्यात आली. स्मार्ट प्रकल्पांतर्गत (मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय आणि ग्रामीण परिवर्तन) कंपनीने शीतगृह, प्री - कूलिंग युनिट्स आणि पॅकिंग हाऊसची उभारणी केल्यानंतर ही परिस्थिती बदलली असून, यामुळे शेतकरी निर्यातक्षम उत्पादनासह वर्गीकरण, प्रतवारी, पॅकिंग आणि शीतगृह व्यवस्थापन याद्वारे जागतिक मानके पूर्ण करण्यात यशस्वी ठरले आहेत.

ओमानमध्ये निर्यातीच्या संधीनंतर भागधारक शेतकऱ्यांचा दृष्टिकोन बदलला आहे. आता आम्ही वेग्रो या अॅग्रिटेक प्लॅटफॉर्मच्या मध्यस्थीने आंतरराष्ट्रीय शेती बाजारात सहभागी झालो आहोत. येत्या काळात गुंतवणूकक्षम बनल्यावर पॅलेडियमच्या मार्गदर्शनाखाली कंपनी थेट निर्यातीत उतरेल. यातून ग्रामीण सक्षमीकरण साधले जाणार असून निर्यातक्षम उत्पादन वाढीसाठी कंपनी प्रयत्नशील असल्याचे कंपनीचे प्रमुख अप्पा धनके यांनी सांगितले.




सोलापूर : ओमानला केळी निर्यातीसाठी पाठविताना उळे (ता. दक्षिण सोलापूर) येथील उळे शेतकरी उत्पादक कंपनीचे भागधारक शेतकरी.

### केळी उत्पादन ५०० एकरांपर्यंत वाढविणार

आज या कंपनीचे एक हजार १२७ शेतकरी भागधारक आहेत. त्यांनी १०० एकरांवर केळीची लागवड करत निर्यातीसाठी आगाऊ नोंदणी केली होती. ओमानला यशस्वी निर्यातीनंतर कंपनीने केळीचे उत्पादन ५०० एकरांपर्यंत वाढवण्याचे ठरवले आहे. तसेच ओमान, इराकसह मध्य पूर्वेतील बाजारपेठेत माल पाठवण्याची योजना आखली आहे.

“

केळी निर्यातीत राज्य सरकारच्या स्मार्ट प्रकल्पांतर्गत पॅलेडियमने मार्गदर्शन व तांत्रिक साह्य याद्वारे महत्त्वाची भूमिका निभावली आहे. यंदाच्या हंगामात ३०० एकर निर्यातक्षम द्राक्ष उत्पादनाची तयारी केली आहे. त्या माध्यमातून १५० कंटेनर द्राक्ष निर्यातीचे लक्ष्य निश्चित केले आहे.

- **अप्पा धनके,** प्रमुख, उळे शेतकरी उत्पादक कंपनी, उळे, ता. दक्षिण सोलापूर

‘स्मार्ट’ प्रकल्पांतर्गत २८ कंपन्यांची निवड केली आहे. जिल्ह्यात निर्यातक्षम उत्पादन व त्याची निर्यात करू शकणाऱ्या बऱ्याच कंपन्या आहेत. जिल्ह्यातील अन्य शेतकरी उत्पादक कंपन्यांनीही या दिशेने पावले टाकायला हवीत. यातून ग्रामीण सक्षमीकरण साध्य होईल.

- **कांतप्पा खोत,** प्रकल्प संचालक, कृषी तंत्रज्ञान व व्यवस्थापन यंत्रणा

Agrowon, 05/09/2025

# ‘जीएसटी’ कपातीतून ‘कृषी’ला दिलासा

## ट्रॅक्टर, शेती उपयोगी यंत्रे, ठिबक, पोल्ट्री, मधमाशीपालनाची अवजारे स्वस्त होणार

ॲग्रोवन वृत्तसेवा

**पुणे : अतिवृष्टी, नैसर्गिक आपत्तीच्या संकटांत असलेल्या शेतकऱ्यांच्या खांद्यावरील बोजा केंद्र सरकारने जीएसटी कपात करून काहीसा हलका करित दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. सरकारने ट्रॅक्टर, ट्रॅक्टरचे सुटे भाग, शेती उपयोगी अवजारे आणि यंत्रे, कापड आणि चामड्यांच्या वस्तूंवरील जीएसटी कमी केला आहे.**

जीएसटीमधील जटीलता कमी करण्यासाठी केंद्राने ४ स्तरीय जीएसटी प्रणाली आता २ स्तरीय (स्लॅब) करण्यात आली. आता १८ टक्के आणि ५ टक्के जीएसटी असेल. मात्र काही निवडक वस्तूंवरील जीएसटी ४० टक्के ठेवण्यात आला आहे. केंद्र सरकारने ट्रॅक्टर, माती तयार करण्यासाठी किंवा लागवडीसाठी कृषी, फलोत्पादन किंवा वनीकरण यंत्रसामग्री, कापणी किंवा मळणीची यंत्रसामग्री, खत तयार करणाऱ्या यंत्रासह इतर शेती उपयोगी यंत्रावरील जीएसटी १२ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत कमी




केली आहे. हस्तकला, मार्बल आणि ट्रॅव्हर्टाइन ब्लॉक्स, ग्रॅनाइट ब्लॉक्स आणि इंटरमिजिएट लेदर वस्तू यांसारख्या श्रम-केंद्रित वस्तूंवरील जीएसटी १२ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. पान २ वर »

### शेती अवजारे आणि यंत्रे
(जीएसटी टक्क्यांमध्ये)

| यंत्रे, अवजारे | जुना स्तर | नवा स्तर |
|---|---|---|
| ट्रॅक्टर | १८ | ५ |
| ट्रॅक्टरचे पार्ट्स | २८ | ५ |
| ट्रॅक्टर टायर, ट्यूब | १८ | ५ |
| ट्रॅक्टर हायड्रॉलिक पंप | १८ | ५ |
| शेती उपयोगी यंत्रे | १२ | ५ |
| हार्वेस्टर, थ्रेशर | १२ | ५ |
| ड्रीप आणि ठिबकचे नोझल | १२ | ५ |
| शेती, पोल्ट्री, मधमाशीपालन अवजारे | १२ | ५ |

## अन्नप्रक्रिया, कृषी उद्योगातून निर्णयाचे स्वागत

ॲग्रोवन वृत्तसेवा

पुणे : केंद्र शासनाने कृषी व संलग्न क्षेत्रातील उत्पादनांच्या वस्तू व सेवा करात (जीएसटी) कपात केल्यामुळे कृषी उद्योग जगतात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या करकपातीचे सूक्ष्म सिंचन, ट्रॅक्टर, यंत्रे, खते, डेअरी, साखर, अन्न प्रक्रिया उद्योगातून स्वागत होत आहे.

पान ४ वर »

“ सूक्ष्म सिंचन संचावरील जीएसटी घटविण्यासाठी राज्याच्या अर्थ विभागाकडे आमचा सतत पाठपुरावा चालू होता. त्याला यश आल्यामुळे उद्योजक समाधानी आहेत.

- कृष्णात महामूलकर, उपाध्यक्ष, इरिगेशन असोसिएशन ऑफ इंडिया

Agrowon, 05/09/2025

» पान १ वरून

सिमेंटवरील जीएसटीमध्ये २८ टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला. केसांचे तेल, साबण, शाम्पू, टूथब्रश, टूथपेस्ट, सायकल, टेबलवेअर, किचनवेअर आणि इतर घरगुती वस्तूंवरील जीएसटी १८ ते १२ टक्क्यांवरून ५ टक्के करण्यात आला. ३३ जीवरक्षक द्रव्ये आणि औषधांवरील तसेच कर्करोग, दुर्मिळ आजार आणि इतर गंभीर जुनाट आजारांवर उपचार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या ३ जीवरक्षक द्रव्ये आणि औषधांवरील जीएसटी ५ टक्क्यांवरून शून्य करण्यात आला आहे. इतर सर्व द्रव्ये आणि औषधांवरील जीएसटीमध्ये १२ टक्क्यांवरून ५ टक्के करण्यात आला आहे. वैद्यकीय उपकरणे आणि साधनांवरचा जीएसटी १२ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत कमी केल्याने उपचारावरील खर्च कमी होण्याची शक्यता आहे.

### खाद्यपदार्थ स्वस्त

चपाती, खाकरा, पराठा आणि इतर भारतीय ब्रेडवरील जीएसटी शून्य करण्यात आला आहे. अल्ट्रा-हाय टेंपरेचर (UHT) दूध, पॅकबंद आणि लेबल केलेले पनीर यांसारख्या काही वस्तूंवरील जीएसटी ५ टक्क्यांवरून शून्य करण्यात आला आहे. साखर, प्रक्रियायुक्त भाजीपाला, फळे, टोमॅटो, मशरूम, जाम, फ्रूट जेली, सॉस, २० लिटरपर्यंत पॅकिंगचे पिण्याचे पाणी, सोयामिल्क पेय, फळांचा गर आणि ज्यूस, दुधापासून तयार अन्न, पॅकबंद नमकीन, भुजिया, सॉस, पास्ता, इन्स्टंट नूडल्स, चॉकलेट, कॉफी, संरक्षित मांस, कॉर्नफ्लेक्स, बटर, तूप, खजूर, अंजीर, अननस, अवेकॅडो, पेरू, आंबा, संत्री, लिंबूवरील जीएसटी १८ ते १२ टक्क्यांवरून वरून ५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे.

### विमा पॉलिसी करमुक्त

सामान्य माणसासाठी विमा परवडणारा बनवण्यासाठी आणि देशात विमा संरक्षण वाढवण्यासाठी सर्व प्रकारच्या वैयक्तिक आयुर्विमा पॉलिसी, टर्म लाइफ, युलिप किंवा एंडोमेंट पॉलिसी आणि रिइन्शुरन्स जीएसटीमधून वगळण्यात आले. आता वैयक्तिक आरोग्य विमा पॉलिसी, कौटुंबिक विमा पॉलिसीसह ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या पॉलिसीवरील जीएसटी काढून टाकण्यात आला.

### कापडावरील जीएसटी कमी

केंद्र सरकारने आता सर्व प्रकाराच्या कापड आणि कापड निर्मितीसाठी लागणाऱ्या इतर कच्च्या मालावरील जीएसटी १२ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत कमी केला आहे. मात्र २५०० रुपयांपेक्षा जास्त विक्री किंमत असलेल्या कापडावरील जीएसटी १२ टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत वाढवला आहे. मानवनिर्मित कापड, धाग्यावरील जीएसटीही १२ टक्क्यांवरून ५ टक्के केला आहे.

### इतर वस्तूंवरील जीएसटी (टक्क्यांमध्ये)

| वस्तू | जुना स्तर | नवा स्तर |
|---|---|---|
| चामडे आणि चामड्याच्या वस्तू | १२ | ५ |
| हस्तकला केलेल्या वस्तू | १२ | ५ |
| बांबू फ्लोरिंग | १२ | ५ |
| बांबू आणि लाकडाच्या वस्तू | १२ | ५ |
| सोलार वॉटर हिटर | १२ | ५ |
| बायोगॅस प्लांट | १२ | ५ |
| सोलार पॉवर जनरेटर | १२ | ५ |
| मासेमारी अवजारे | १२ | ५ |
| स्पेसिफाइड बायो-पेस्टिसाईड्स, मायक्रो न्यूट्रिएन्ट्स | १२ | ५ |
| पेट्रोल आणि पेट्रोल हायब्रीड, एपीजी, सीएनजी कार (१२०० सीसी आणि ४००० एमएमच्या आतील) | २८ | १८ |
| डिझेल आणि डिझेल हायब्रीड कार (१५०० सीसी आणि ४००० एमएमच्या आतील) | २८ | १८ |
| तीनचाकी वाहने | २८ | १८ |
| मोटरसायकल (३५० सीसी आणि त्याखालील) | २८ | १८ |
| मालाची वाहतूक करण्यासाठीची वाहने (बस, ट्रक, रुग्णवाहिका) | २८ | १८ |
| सिमेंट | २८ | १८ |
| सल्फरिक ॲसिड, नायट्रिक ॲसिड आणि अमोनियावरील वस्तू | १८ | ५ |

Agrowon, 01/09/2025

# राष्ट्रीय बाजाराची अधिसूचना कोणत्याही क्षणी

## मसुदा स्वाक्षरीसाठी राज्यपालांकडे; मुंबईसह नागपूरचा समावेश, प्रशासकीय मंडळाबाबत उत्सुकता

**गणेश कोरे : ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : कायम गैरव्यवहारांच्या गर्तेत असलेल्या मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाची मुदत रविवारी (ता. ३१) संपुष्टात आली आहे. मात्र संचालक मंडळाला मुदतवाढ देण्यास राज्य सरकारने स्पष्ट नकार दिला असल्याचे समजते.

संचालक मंडळाने मुदतवाढीसाठी सरकारमधील अनेक नेत्यांकडे 'वजन' वापरल्याची चर्चा आहे. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा प्रस्ताव फेटाळल्याचे समजते. तर मुंबईसह नागपूर बाजार समितीला पहिल्या टप्प्यात राष्ट्रीय बाजार करण्याच्या अधिसूचनेचा मसुदा राज्यपालांच्या सहीसाठी सादर झाल्याची माहिती पणन मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. तर राज्यपालांची सही होऊन कोणत्याही क्षणी अधिसूचना जारी होण्याची शक्यता वर्तविण्यातच येत आहे.

राष्ट्रीय बाजार समित्या स्थापन करणे हा केंद्र सरकारच्या पणन सुधारणांमधील महत्त्वाचा टप्पा आहे. त्यानुसार राज्यातील प्रमुख बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्याचे गेल्या दहा वर्षांपासून प्रस्तावित आहे. मात्र राजकीय घडामोडींमुळे ते शक्य झाले नव्हते. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील



महायुतीच्या सरकारने बाजार समित्यांना राष्ट्रीय करण्याच्या महत्त्वाच्या बदलांना गांभीर्याने घेत, हा निर्णय घेतला. यानुसार ज्या बाजार समित्यांमध्ये एकूण आवकेच्या ३० टक्के शेतीमाल हा ३ पेक्षा अधिक राज्यांमधून होतो. अशा बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्याचे नवीन राष्ट्रीय पणन कायद्याच्या मसुद्यात म्हटले आहे. यानुसार राज्यातील मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, सोलापूर, कोल्हापूर, सांगली या बाजार समित्यांना राष्ट्रीय करण्याबाबत राज्य मंत्रिमंडळाने नुकतीच मान्यता दिली आहे. त्यानुसार सहा बाजार समित्या राष्ट्रीय करण्याच्या हालचाली शासन पातळीवर सुरू आहेत. दरम्यान, मुंबई (वाशी) कृषी उत्पन्न बाजार समिती ही बाजार समिती राजकीयदृष्ट्या हातात ठेवण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांचे आटोकाट प्रयत्न राहिले आहे. तर या बाजार समितीवर नेहेमीच काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांचे कायम वर्चस्व राहिले आहे. भाजपने देखील ही बाजार समिती ताब्यात घेण्याचे आटोकाट प्रयत्न केले. मात्र निवडणुकांच्या माध्यमांमधून ते शक्य झाले नाही. त्यामुळे या बाजार समितीवर वर्चस्व प्रस्थापित करणे आता भाजपला राष्ट्रीय बाजारातून शक्य होणार आहे. तर वरिष्ठ मंत्र्यांनी बाजार समितीच्या गेल्या अनेक वर्षांच्या गैरकारभाराबाबत नाराजी व्यक्त करत मुदतवाढीचा विषय मुख्यमंत्र्यांच्या कोर्टात ढकलला. तर संचालक मंडळाचे मुख्यमंत्र्यांकडे मुदतवाढीच्या मागणीसाठीचा प्रस्ताव घेऊन जाण्याचे धाडस झाले नसल्याचे समजते.

### पुणे बाजार समितीला वगळले?

पुणे जिल्ह्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कायमच वर्चस्व राहिले आहे. राष्ट्रीय बाजारांमध्ये पुणे बाजार समितीचा पण समावेश होता. मात्र अजित पवार यांनी आपले राजकीय वजन वापरून तूर्तास पुणे बाजार समितीला राष्ट्रीय होण्याच्या यादीतून वगळल्याचे समजते. या मागे यशवंत सहकारी कारखान्याच्या ९९ एकर जमिनीच्या खरेदीचा व्यवहार असल्याची चर्चा आहे. सुमारे ३०० कोटींचा हा व्यवहार असून, हा व्यवहार राष्ट्रीयीकरणामध्ये अडकू नये यासाठी श्री. पवार यांनी आग्रह धरल्याची चर्चा पणन विभागात आहे.